# सख्या कशी सांगु तुला

सख्या कशी सांगु तुला मनाची या हुर-हुर..
दाह याचा सोसु कसा ? तू ही असा दूर-दूर...
मृगजळासम भासे कधी तुझा सहवास,
तापुनही मग थंड, माझे अगतिक श्वास...
घेऊनिया पंख नवे, स्वप्नदेशी उडे मन,
एकलेच मागे फिरे, आणि हरवुन भान...
रानातील पायवाट, करु लागे खाणा-खुणा,
देह नवा पांघरोनी, पळू लागे मी ही पुन्हा..
थकुनिया जेंव्हा मग, होते काळीज हे चूर,
भिरभिर भटकुन, अंती डोळा महापूर !!!!


**© प्रीती देशपांडे**

[www.meetipreeti.com](http://www.meetipreeti.com)